# "आर्यभट्ट मेन्स स्कॉलरशिप परीक्षा"

## मूल्यशिक्षण, पुस्तकी शिक्षण व व्यावहारिक शिक्षणाद्वारे
## चरित्रनिर्माण + क्षमताविकास + स्वओळख

नमस्कार,

गेली १८ वर्षे अनेक शाळांमध्ये **'आर्यभट्ट मेन्स स्कॉलरशिप परीक्षा'** संपन्न होत आहे. शालेय जीवनापासूनच विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचे स्वरूप लक्षात यावे तसेच स्पर्धा परीक्षांबद्दल मनातील भीती जावी आणि परीक्षेची गोडी लागावी या मूलभूत हेतूने सुरु झालेल्या या परीक्षेने आजवर २०० शाळांच्या तब्बल १ लाखाहून अधिक विद्यार्थ्यांना आत्मविश्वास मिळवून दिला आहे. ही परीक्षा **महाराष्ट्र राज्य शैक्षणिक मंडळाच्या अभ्यासक्रमावर** आधारित असून या परीक्षेत **इंग्रजी, गणित, विज्ञान तसेच सामान्य ज्ञान (बँकिंग व वित्त व्यवहार, खेळ, बुद्धिमत्ता चाचणी, नागरिकशास्त्र, भारतीय मूल्य आणि संस्कृती)** हे विषय समाविष्ट केले आहेत.

दरवर्षी प्रमाणे ही परीक्षा वर्षातून एकदाच ऑफलाईन अर्थात कागद लेखणीच्या सहाय्याने OMR पद्धतीने संपन्न होईल. यावर्षी **गुरुवार, दिनांक – २६ फेब्रुवारी, २०२६** रोजी ही परीक्षा महाराष्ट्रातील विविध केंद्रांवर एकाच वेळी घेतली जाईल. परीक्षेची तयारी करण्यासाठी अभ्यास साहित्य छापील स्वरूपात उपलब्ध करून दिले जाईल.

आम्ही या पत्रासोबत परीक्षा पद्धतीचे स्वरूप व रचना विस्ताराने जोडले आहे, आपण ते जरूर पहावे आणि काही त्रुटी आढळल्यास कळवावे. आपल्या सूचना, कल्पना, विचार, शंका, आग्रह, टीका, मूल्यवर्धन यांचे कायमच स्वागत आहे. तसेच या पत्राद्वारे आम्ही आवाहन करीत आहोत की आपल्या शाळेतील इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना अधिकाधिक संख्येने या परीक्षेत सहभागी करून घ्यावे.

या परीक्षेमध्ये आर्थिकदृष्ट्या कमकुवत वर्गातील अधिकाधिक विद्यार्थ्यांना ही सहभागी होता यावे, याकरिता आम्ही समाजाकडून सवलतीच्या दरातील परीक्षा शुल्क देणगी स्वरूपात गोळा करण्याचे ठरविले आहे. जेणेकरून विविध संस्था आणि दानशूर व्यक्तींनाही या कार्यात सक्रीय स्वरूपाचा सहभाग घेता येईल. परीक्षा शुल्क किंवा स्कॉलरशिपसाठी दिली गेलेली देणगी **आयकर कायद्याचे ८०G कलमांतर्गत** कर सवलतीस प्राप्त आहे.

धन्यवाद,

सारिका शिवप्रसाद शेंडे
संचालिका
ज्योतिर्गमय शिक्षण, संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
संपर्क : ७८७५०४२२५९

महांतेश संगोंडा नाईक
समन्वयक
आर्यभट्ट स्कॉलरशिप परीक्षा केंद्र, पुणे
संपर्क : ९९२३१३६४८८

## परीक्षेचे स्वरूप :

| | |
|---|---|
| परीक्षेचे स्वरूप | **इयत्ता १ ली ते ८ वी (इंग्रजी, सेमी इंग्रजी)**<br><br>विज्ञान, गणित, इंग्रजी, सामान्यज्ञान (बँकिंग व वित्त व्यवहार, खेळ, बुद्धिमत्ता चाचणी, नागरिकशास्त्र, भारतीय मूल्ये आणि संस्कृती)<br><br>ऑफलाईन ऑब्जेक्टिव्ह पद्धतीने गुरुवार, दिनांक – २६ फेब्रुवारी, २०२६ रोजी संपुर्ण महाराष्ट्रात एकाच दिवशी |
| परीक्षा शुल्क | रुपये ३३०/- |
| अभ्यास साहित्य स्वरूप व रचना | अभ्यास साहित्य छापील स्वरुपात उपलब्ध, प्रश्नसंचाच्या स्वरुपात अभ्यासक्रमानुसार |
| अभ्यास साहित्य शुल्क | रुपये ६०/- |
| प्रोत्साहन शुल्क (80G सवलतसहित) | रुपये ३००/- ( कमीत कमी ५ विद्यार्थ्यांकरीता ) |
| सामान्य नोंदणीचे अंतिम दिनांक | २४ ऑगस्ट, २०२५ |
| दंडासहित नोंदणीचे अंतिम दिनांक | २४ सप्टेंबर, २०२५ |
| परीक्षेचे अभ्यासक्रम | ४० % अभ्यासपुस्तिका + ६०% शालेय पाठ्यपुस्तकातील संपूर्ण वर्षातील अभ्यासक्रम |
| परीक्षेचे वार व दिनांक | गुरुवार, दिनांक - २६ फेब्रुवारी, २०२६ |
| परीक्षेचे केंद्र | सहभागी शाळा |

## परीक्षेचे रचना :

| इयत्ता | परीक्षेचे स्वरूप |
|---|---|
| १ ली<br>२ री | **३० प्रश्न – ३० गुण – ६० मिनिटे वेळ**<br>१) इंग्रजी व पर्यावरण विज्ञान : १० (१० गुण)<br>२) गणित : १० (१० गुण)<br>३) सामान्यज्ञान : १० (१० गुण) बँकिंग व वित्त व्यवहार : ०२ (०२ गुण)<br>• खेळ : ०२ (०२ गुण)<br>• बुद्धिमत्ता चाचणी : ०२ (०२ गुण)<br>• नागरिकशास्त्र : ०२ (०२ गुण)<br>• भारतीय मूल्ये आणि संस्कृती : ०२ (०२ गुण) |
| ३ री<br>४ थी<br>५ वी | **६० प्रश्न - ६० गुण – ९० मिनिटे वेळ**<br>१) इंग्रजी : १५ (१५ गुण)<br>२) गणित : १५ (१५ गुण)<br>३) विज्ञान : १५ (१५ गुण)<br>३) सामान्यज्ञान : १५ (१५ गुण)<br>• बँकिंग व वित्त व्यवहार : ०३ (०३ गुण)<br>• खेळ : ०३ (०३ गुण)<br>• बुद्धिमत्ता चाचणी : ०३ (०३ गुण)<br>• नागरिकशास्त्र : ०३ (०३ गुण)<br>• भारतीय मूल्ये आणि संस्कृती : ०३ (०३ गुण) |
| ६ वी<br>७ वी<br>८ वी | **१०० प्रश्न – १०० गुण – १२० मिनिटे वेळ**<br>१) इंग्रजी : २५ (२५ गुण)<br>२) गणित : २५ (२५ गुण)<br>३) विज्ञान : २५ (२५ गुण)<br>४) सामान्यज्ञान : २५ (२५ गुण)<br>• बँकिंग व वित्त व्यवहार : ०५ (०५ गुण)<br>• खेळ : ०५ (०५ गुण)<br>• बुद्धिमत्ता चाचणी : ०५ (०५ गुण)<br>• नागरिकशास्त्र : ०५ (०५ गुण)<br>• भारतीय मूल्ये आणि संस्कृती : ०५ (०५ गुण) |

## बक्षीसांचे स्वरूप :

| बक्षीसांचे तपशील | स्वरूप |
| --- | --- |
| महर्षी आर्यभट्ट सुवर्णपदक | • प्रति इयत्ता सर्व विषयांमधून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती (स्कॉलरशिप)<br>• सुवर्णपदक<br>• प्रमाणपत्र<br>• रु. ५००० स्कॉलरशिप<br>• एकापेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी समान गुण मिळविल्यास स्कॉलरशिप रक्कम विभागून दिला जाईल |
| व्याकरणकार ऋषी पाणिनी इंग्रजी भाषा प्रोत्साहन पदक | • प्रति इयत्ता प्रति विषयाकरिता सर्वात जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता<br>• सुवर्णपदक<br>• प्रमाणपत्र |
| आधुनिक ऋषी रामानुजन गणित विषय प्रोत्साहन पदक | • प्रति इयत्ता प्रति विषयाकरिता सर्वात जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता<br>• सुवर्णपदक<br>• प्रमाणपत्र |
| महर्षी कणाद विज्ञान विषय प्रोत्साहन पदक | • प्रति इयत्ता प्रति विषयाकरिता सर्वात जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता<br>• सुवर्णपदक<br>• प्रमाणपत्र |
| ब्रह्मर्षी विश्वामित्र सामान्यज्ञान विषय प्रोत्साहन पदक | • प्रति इयत्ता प्रति विषयाकरिता सर्वात जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता<br>• सुवर्णपदक<br>• प्रमाणपत्र |

## आर्यभट्ट मेन्स स्कॉलरशिप परीक्षा तपशील : २०२४ – २५

| तपशील | संख्या |
|---|---|
| सहभागी शाळा | २२ |
| महर्षी आर्यभट्ट सुवर्णपदक, स्कॉलरशिप (रोख बक्षीस) व प्रमाणपत्र विजेते | • इयत्ता १ली : ७ विद्यार्थी<br>• इयत्ता २ री : ९ विद्यार्थी<br>• इयत्ता ३ री : ९ विद्यार्थी<br>• इयत्ता ४ थी : ७ विद्यार्थी<br>• इयत्ता ५ वी : ६ विद्यार्थी<br>• इयत्ता ६ वी : ३ विद्यार्थी<br>• इयत्ता ७ वी : ३ विद्यार्थी<br>• इयत्ता ७ वी : ४ विद्यार्थी<br>**एकूण विद्यार्थी : ४८**<br>**एकूण स्कॉलरशिप (रोख बक्षिस): रु. ४००००/-** |
| व्याकरणकार ऋषी पाणिनी इंग्रजी भाषा प्रोत्साहन पदक व प्रमाणपत्र विजेते | ९१ विद्यार्थी |
| आधुनिक ऋषी रामानुजन गणित विषय प्रोत्साहन पदक व प्रमाणपत्र विजेते | ९० विद्यार्थी |
| महर्षी कणाद विज्ञान विषय प्रोत्साहन पदक व प्रमाणपत्र विजेते | १९ विद्यार्थी |
| ब्रह्मर्षी विश्वामित्र सामान्यज्ञान विषय प्रोत्साहन पदक व प्रमाणपत्र विजेते | ६० विद्यार्थी |
| **एकूण बक्षीसपात्र विद्यार्थी संख्या** | **३०८ विद्यार्थी** |